**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/अपंगशिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत/२०१९-२०/3247 दिनांक : २७.११.२०१९

**अत्यंत महत्वाचे / मेलद्वारे**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२० च्या महाविद्यालय स्तरावरील अर्जांच्या पडताळणीबाबत...**

संदर्भ : - १. केंद्र शासनाचा दि. ७.११.२०१९ रोजीचा ईमेल.
२. मा. संचालनालयाचे पत्रक क्र. उशिसं २०१९-२०/केंद्र पुरस्कृत/शिष्यवृत्ती/१५३३१ दि. २७.११.२०१९.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकास अनुसरुन कळविण्यात येते की, **अपंग विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२० साठी ऑनलाईन अर्जांची पडताळणी करण्याचा महाविद्यालय स्तरावरील अंतिम दिनांक ३०.११.२०१९ आहे. यानंतर ही मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.**

**अद्यापपर्यंत पुणे विभागातंर्गत महाविद्यालय स्तरावर एकूण ४४ अर्ज पडताळणी करण्याचे बाकी आहेत. तरी महाविद्यालय स्तरावरील अर्ज विहीत मुदतीत ऑनलाईन पडताळणी करुन फॉरवर्ड करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीत महाविद्यालयांकडून ऑनलाईन पडताळणी करुन फॉरवर्ड न झाल्यास तसेच विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांची राहील. पुणे विभागंतर्गत प्रलंबित अर्जांची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **अर्जांची संख्या (नविन मंजूरी)** | **अर्जांची संख्या (नुतनीकरण मंजूरी)** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | ३४ | १० | ४४ |

**सदर विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीत महाविद्यालयांकडून ऑनलाईन पडताळणी करुन फॉरवर्ड न झाल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाहीत याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी.**

सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे करिता.

प्रति -
१. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे.
२. मा. उप संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर
४. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
६. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
७. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.